# धुळे महानगरपालिका,धुळे

मा.प्रशासक तथा आयुक्त
नगरसचिव कार्यालय

---

## स्थायी समिती सभा क्रमांक ३४

---

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४दि. २९/१२/२०२३ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीत अंतर्भुत केलेल्या कलम ४५२ अ (१अ) अन्वये मा.प्रशासक सो. यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार स्थायी समिती सभेसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर निर्णय घेणेसाठी **बुधवार दिनांक २४/०७/२०२५ दुपारी ४-३० वाजता स्व.दिलीप पायगुडे सभागृहात आयुक्त तथा प्रशासक श्रीमती अमिता दगडे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली** संपन्न झाली. सदर सभेस खालील अधिकारी उपस्थित होते.

| **अ.क्र.** | **अधिकाऱ्यांचे नाव** | **पदनाम** |
|---|---|---|
| १. | श्रीमती अमिता दगडे-पाटील | आयुक्त तथा प्रशासक |
| २. | श्री हेमंत निकम | उपायुक्त |
| ३. | श्रीमती शोभा बाविस्कर | उपायुक्त |
| ४. | श्रीमती स्वालिया मालगावे | करमुल्य निर्धारण तथा कर संलकन अधिकारी |
| ५. | श्री सुनिलकुमार सुर्यवंशी | उपमुख्यलेखापरीक्षक |
| ६. | श्री.मनोज वाघ | नगरसचिव |
| ७. | श्रीमती वर्षा घुगरी | कार्य. अभियंता बांधकाम |
| ८. | श्री नवनित सोनवणे | कार्य. अभियंता पाणीपुरवठा |
| ९. | श्रीमती संपदा कुलकर्णी | प्र.आरोग्याधिकारी |
| १०. | श्री चंद्रकांत मोरे | लेखा विभाग |
| ११. | श्री राजेंद्र माईनकर | प्र. भांडारपाल |
| १२. | श्री के.डी साबळे | लिपीक आस्थापा विभाग |
| १३. | श्री.लक्ष्मण पाटील | प्र.सहा.आरोग्याधिकारी |
| १४. | श्री चंद्रकांत जाधव | प्र. मलेरीया पर्यवेक्षक |
| १५. | श्री राजेश वसावे | मुख्य स्वच्छता निरीक्षक |
| १६. | श्री.चंद्रकांत उगले | उप अभियंता, पाणीपुरवठा विभाग |
| १७. | श्री एन.के. बागुल | उप अभियंता, विद्युत विभाग |
| १८. | श्री प्रकाश सोनवणे | उप अभियंता नगररचना |
| १९. | श्री कमलेश सोनवणे | सहा. अभियंता नगररचना |
| २०. | श्री मधुकर निकुंभे | मालमत्ता व कर विभाग |
| २१. | श्री संभाजी सुडके | लिपीक शिक्षणमंडळ |
| २२. | श्री. गणेश खोंडे | प्रकल्प विभाग |
| २३. | श्री.रविकिरण पाटकरी | प्र.वृक्षसमिती प्रमुख |
| २४. | श्रीमती कल्पना जाधव | अभिलेखापाल |
| २५. | श्री दुष्यंत महाजन | अग्निशमन विभाग |

म.नगरसचिव वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वानी उभे रहावे.

**मा.प्रशासक:-** आजच्या सभेचे कामकाजास सुरूवात करण्यात यावे

विषय क्रमांक:-५५३ माझी वसुंधरा 4.0 अंतर्गत धुळे शहरातील विविध चौक व पांझरा नदी किनार येथे सोलर ट्री तसेच मनपा कंपोस्ट डेपो येथे सोलर पार्क उभारणी करणेकामी (माझी वसुंधरा अभियान 4.0 अंतर्गत प्राप्त झालेल्या बक्षीस रक्कमेतून) आलेल्या निविदा दर मंजूरीस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता (विद्युत) माझी वसुंधरा ४.० अंतर्गत शहराती विविध चौक व पांझरा नदी किनारी येथे सोलर ट्री तसेच मनपा वरखेडी कंपोस्ट डेपो येथे ३०० KWT चे सोलर सिस्टीम बसविणेकामी हा डीपीआर सादर केला होता. त्यास मिळालेल्या मान्यतेप्रमाणे निविदा मागविण्यात येवुन त्यात ओमश्री मंगलमुर्ती इलेक्ट्रीकल्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर,नाशिक यांचे ०.०१ टक्के कमी या दराने प्राप्त झाले आहे. दर मंजुरीस्तव सादर करण्यात आला आहे. विषय मंजुरीस हरकत नसावी.

मा.आयुक्त तथा प्रशासक तेथील जागा क्लीअर आहे का.

मा. उपअभियंता तेथे ४ शेड आहे, तेथे करणार आहेत.

मा.आयुक्त तथा प्रशासक हे झाली माझी वसुंधराच आणि युजीडी चे काय

मा. उपायुक्त आता मोठे मशिन बसविले आहे. जे जुने ७५ हजार क्युबीक मिटर जो क्वाटंम होता. तो संपत आला आहे. त्यानंतर ५० हजार क्युबीक मिटरचा क्वाटंम होता. त्याची प्रशासकीय मान्यता राज्य संचालनालयाकडुन मिळते आहे. त्याचे पैसे तात्काळ मिळणार आहे. त्याचे टेंडर आपण करु शकतो.

मा.आयुक्त तथा प्रशासक जीआर झाला की त्याचे टेंडर करुन टाका. साईट लवकर रिकामी करुन द्यावी. त्यामुळे पॅनेलवर धुळ बसते. त्याची इफिशियन्सी कमी होते. साईट क्लीअर असेल तर काम करा.सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ५३१ दिनांक २४/०७/२०२५**

माझी वसुंधरा ४.० अंतर्गत धुळे शहरातील विविध चौक व पांझरा नदी किनार येथे सोलर ट्री तसेच मनपा कंपोस्ट डेपो येथे सोलर पार्क उभारणी करणेकामी मा. कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन यांची प्रशासकीय मान्यता क्र. २०२४/प्र.क्र.०४/(८०) /तां.क्र.०१ व दि.२६/०५/२०२५ अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु.२,४९,६२,२७१/- मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त कामाबाबत विहीत पध्दतीने निविदा दर मागविणेत आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत Online पद्धतीने बयाणा रक्कम भरून/लेटर प्याड वर निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | ओम श्री मंगलमूर्ती इलेक्ट्रिकल्स & contractor, नाशिक | 0.01 % कमीने | L१ |
| 2 | मार्तंड एन्टरप्रायजेस, नाशिक | 3% जास्तीने | |

निविदेमध्ये तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता मे. ओम श्री मंगलमुर्ती इलेक्ट्रिकल्स & Contractors, नाशिक यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे म्हणजेच रु. २,४९,५९,७७४/- इतक्या रकमेची असुन ती अंदाजपत्रकीय दराच्या ०.०१% कमीने आहे. करिता ठेकेदार मे. ओम श्री मंगलमुर्ती इलेक्ट्रिकल्स & Contractors, नाशिक. यांचे दर तुलनेत सर्वात कमी दर मान्यतेस्तव स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार, माझी वसुंधरा ४.० अंतर्गत धुळे शहरातील विविध चौक व पांझरा नदी किनार येथे सोलर ट्री तसेच मनपा कंपोस्ट डेपो येथे सोलर पार्क उभारणी करणेकामी (माझी वसुंधरा अभियान ४.० अंतर्गत प्राप्त झालेल्या बक्षीस रक्कमेतून) मे. ओम श्री मंगलमुर्ती इलेक्ट्रिकल्स & Contractors, नाशिक यांच्या अंदाजपत्रकीय दराच्या ०.०१% कमी या आलेल्या निविदा दरास मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-५५४ धुळे महानगरपालिका हद्दीत मालमत्ता कर भरणे कामी २९ व ३० मार्च २०२५ रोजी रिक्षाद्वारे जाहिर आवाहन करण्यात आले असुन झालेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.भांडारपाल धुळे मनपा हददीतील थकीत मालमत्ता कर भरणेकामी शास्ती माफी २०२५ मध्ये करण्यात आली होती. त्याअनुषंगाने शहरातील नागरीकांना या शास्ती माफीचा लाभ देणेकामी धुळे शहर व हददवाढ भागासाठी दि. २९ माचे २०२५ व ३० मार्च २०२५ या दोन दिवसाच्या कालावधीसाठी रिक्षाव्दारे साऊंडच्या माध्यमातुन थकीत कर भरणेबाबत जाहिर आवाहन करण्यात आले. त्या अनुषंगाने सदरचे कामाबाबत संदेश साऊंड सिस्टीम, धुळे यांच्याकडुन सदरचे काम करुन घेण्यात आले. त्यास एकुण रु. १५०००/- मात्र खर्चाचे बिल प्राप्त झाले आहे. खर्चास मान्यतेस्तव विषय मे. स्थायी समितीपुढे सादर करण्यात आला आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक यात दोन तीन गोष्टी महत्वाच्या आहे. टॅक्सेशनचे आपण वर्कआऊट केले आहे. ३१ तारखेला मुदत संपत आहे. नगरविकास विभागाकडुन आपल्याला पत्र आले आहे. उचित कार्यवाही करणेबाबत नागरीकांच्या तक्रारी येत आहे. ते पुन्हा मोजमाप करावे. ज्या डाऊटफुल प्रॉपर्टी आहे जसे की, जास्तीचा टॅक्स लागला आहे, चुकीचा टॅक्स लागला आहे. त्याबाबत एक प्रेस नोट देवुन टाकावी. आपण २ महिन्यात२८००-२९०० लोकांचे अर्ज प्रोसेस केले. त्यात तफावत असेल तर नविन बिल देखील दिली आहे. शास्ती माफीचे प्रोव्हेजन दोन महिने राहिल. ज्यांचे चुकीचे मोजमाप झाले. त्याबाबत प्रेसनोट द्यावी. शिक्षण कर व रोजगार हमी कर याबाबत रॅण्डम सॅम्पलींग करुन बिले तपासुन घ्यावी. तक्रारी व अडचणी असतील तर त्यासाठीही अर्ज करण्यासाठी रिक्षाव्दारे जाहिर आवाहन करण्यात यावे. सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ५३२ दिनांक २४/०७/२०२५**

धुळे महानगरपालिका हद्दीतील थकीत मालमत्ता कर भरणे कामी शास्ती माफी मार्च २०२५ मध्ये करण्यात आली होती.त्या अनुषंगाने शहरातील नागरीकांना या शास्ती माफीचा लाभ घेणे कामी धुळे शहर व हद्दवाढ भागासाठी दि.२९ मार्च २०२५ व ३० मार्च २०२५ या दोन दिवसाच्या कालावधीसाठी रिक्षा द्वारे साऊंड च्या माध्यमातुन थकीत मालमत्ता कर भरणे बाबत जाहिर आवाहन करण्यात आले होते.

त्याअनुषंगाने सदरचे कामाबाबत संदेश साऊंड सिस्टीम,धुळे त्यांच्याकडुन सदरचे कामाबाबत एकूण १५,०००/- मात्र खर्च सादर करण्यात आलेला आहे. सदर खर्च कार्योत्तर मान्यतेस्तव मे. स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार, धुळे महानगरपालिका हद्दीत मालमत्ता कर भरणे कामी २९ व ३० मार्च २०२५ रोजी रिक्षाद्वारे जाहिर आवाहन करण्यात आले असुन झालेला खर्च रुपये १५,०००/- मात्र ला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) अन्वये कार्योत्तर मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-५५५ दि.२१ जुन २०२५ हा दिवस १० वा आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणुन साजरा करणे कामी झालेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबत झालेल्या कार्यालयीन अहवालावर फेरनिर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

भांडारपाल दि. २१ जुन २०२५ रोजी आंतरराष्ट्रीय योगदिन साजरा झाला. मा. जिल्हाधिकारी महोदय यांनी याबाबतची सर्व व्यवस्था धुळे मनपाकडे सोपवली होती. त्यानुसार सदरची कार्यवाही करण्यात आली. खर्चास कार्योत्तर मान्यतेस्तव मे. स्थायी समितीपुढे सादर करण्यात आले आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक पुढील वर्षी योगदिन हा योग दिन मनपाने स्वत: करावा. मनपाने स्वतंत्र योगदिनाचे आयोजन करावे. सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ५३३ दिनांक २४/०७/२०२५**

दि.२१ जुन २०२५ हा दिवस १० वा आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त मा.उपायुक्त सो यांनी भांडार विभाग व विद्युत विभाग यांनी सदर कार्यक्रम व्यवस्थेची संपुर्ण कार्यवाही करावी असे

नमुद केले असता सदर कार्यक्रम यशस्वी करणेसाठी धुळे मनपा कडेस साहित्य उपलब्ध नाही सदर कार्यक्रमा करीता साहित्य भाडेतत्वार सेवा घेऊन कार्यक्रम यशस्वी करता येईल तरी सदर सेवेकरीता धुळे शहरातील मंडप धारक मे. श्री स्वामी समर्थ मंडप डेकोरेटर्स, धुळे यांचे कडेस सदर सेवे बाबत खर्च काढणेत आलेला आहे.

त्याअनुषंगाने सदरचे काम तातडीचे असल्याने सदरच्या कामाबाबत मे.श्री स्वामी समर्थ मंडप डेकोरेटर्स, धुळे त्यांच्याकडुन सदरचे काम करुन घेण्यात आलेले असून याकामी एकूण खर्च रुपये **६,२७,७६०/- मात्र (जीएसटी सहीत)** त्यांनी सादर केलेला आहे. सदरचा प्रस्ताव कार्योत्तर मान्यतेस्तव मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार, दि.२१ जुन २०२५ हा दिवस १० वा आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणुन साजरा करणे कामी झालेला खर्च रुपये **६,२७,७६०/- मात्र (जीएसटी सहीत)** मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) अन्वये कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.यापुढे आंतरराष्ट्रीय योग दिनाचा कार्यक्रम मनपामार्फत स्वतंत्रपणे घेण्यात यावा. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-५५६ — धुळे मनपा हद्दीत स्थानिक स्वराज्य संस्थाच्या परिक्षणात विशिष्ट नागरी सेवा सुविधा पुरविणे कामा अंतर्गत प्रभाग क्र. १, २, ३ व ५ मधील विविध रस्ते कॉक्रीट करणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

उपअभियंता — धुळे मनपा हददीत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या परिक्षणात विशिष्ट नागरी सेवा सुविधा पुरविणे कामा अंतर्गत प्रभाग क्र. १,२,३,५ मधील विविध रस्ते काँक्रिट करणे कामी शासन निर्णय आला होता. त्यानुसार मनपामार्फत प्रस्ताव तयार करुन म. जिल्हाधिकारी महोदय यांचेकडेस आर्थिक व प्रशासकीय मान्यतेस्तव सादर करण्यात आला होता. त्यास मान्यता मिळाल्यानंतर ई निविदा मागविण्यसात येवुन त्यात ४ निविदाधारकांनी भाग घेतला होता, त्यापैकी २ निविदा धारकांनी कागदपत्रांची पुर्तता न केल्याने त्यांना अपात्र करण्यात आले. २ निविदा धारकांपैकी हिंद कन्स्ट्रक्शन, धुळे यांचे अंदाजपत्रकीय दराने सर्वात कमी दर आले आहे. दरास मंजुरीस्तव विषय मे. स्थायी समितीपुढे सादर करण्यात आले आहे. विषय मंजुरीस हरकत नसावी.

मा.आयुक्त तथा प्रशासक — युजीडी चे काम झाल्यानंतरच हे काम करावे.सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ५३४ दिनांक २४/०७/२०२५**

धुळे मनपा हद्दीत स्थानिक स्वराज्य संस्थाच्या परिक्षणात विशिष्ट नागरी सेवा सुविधा पुरविणे कामा अंतर्गत प्रभाग क्र. १, २, ३ व ५ मधील विविध रस्ते कॉक्रीट करणे कामास म.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती , धुळे यांच्या कडील पत्र क्र. जिनिसधु / सांस-२ / २०२५-२६/८८९ दि.०३/०७/२०२५ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु. ७,४९,९७,७४१/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत उपअभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./ ५०,५१,५२,५३ दिनांक १९/०५/२०२५ अन्वये रक्कम रु. ७,४९,९७,७४१/- मात्र खर्चास तांत्रिक मंजूरी मिळालेली आहे. उक्त कामाबाबत विहीत पध्दतीने दि.१५/०७/२०२५ रोजी निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे /ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | हिंद कन्सट्रक्शन , धुळे | अंदाजपत्रकीय दराने | सर्वात कमी दर |
| २ | प्रतिक पुरषोत्तम पुरोहित | शे.२.००% जास्तीने | |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून मे.हिंद कन्सट्रक्शन , धुळे यांचे दर अंदाजपत्राकीय दराने आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे.

सबब कंत्राटदार मे.हिंद कन्सट्रक्शन , धुळे यांची  अंदाजपत्रकीय दराने आलेले निविदा दर मंजुरीसाठी प्रस्ताव मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार, धुळे मनपा हद्दीत स्थानिक स्वराज्य संस्थाच्या परिक्षणात विशिष्ट नागरी सेवा सुविधा पुरविणे कामा अंतर्गत प्रभाग क्र. १, २, ३ व ५ मधील विविध रस्ते काँक्रीट करणेकामी मे.हिंद कन्सट्रक्शन, धुळे  यांचे अंदाजपत्रकीय  दराने या आलेल्या निविदा दरास मान्यता देणेत येत आहे. सदर भागात भूमिगत गटार योजनेचे काम पूर्ण झाल्यानंतरच सदर काम सुरु करण्यात यावे. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**तद्नंतर मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या आदेशाने राष्ट्रगीत गायनानंतर बैठक समाप्त करण्यात आली.**

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**